जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**
**प्रेस नोट दि.०३/०५/२०२४**
**दि.०२/०५/२०२४ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे**

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

**१**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड रोड पो स्टे २३५/२०२४,भादविक ४१९,४२०,३४ |
| **फिर्यादी** | एक महिला वय ६० वर्षे, रा.समर्थ नगर सिंहगड रोड,पुणे |
| **आरोपीत** | दोन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि. ०२/०५/२०२४ रोजी स.११/४५ वा चे दरम्यान मानकर हॉस्पीटल समोरील अदिती अर्पामेन्ट येथील सोसायटीच्या गेटजवळ माणिक बाग सिंहगड रोड पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी ह्या संतोष हॉल जवळ सिंहगड रोड येथे फळे व फुले विक्री करीत असतांना एक अनोळखी इसम फिर्यादी यांचे जवळ येवुन त्यांचे कडील फळे विकत घेवुन फिर्यादी यांना एका बंगल्यामध्ये गरीबांना फुकट रेशन वाटप चालु आहे असे खोटे सांगुन फिर्यादी यांना नमुद ठिकाणी नेवुन तेथे अगोदर हजर असलेला एक इसम याने फिर्यादीला खाली बसण्यास सांगुन फिर्यादीच्या गळयात असलेली सोन्याची बोरमाळ, तसेच सोन्याचे गंठन, तसेच कंबरेला असलेले पैशाचे पाकीट काढुन फिर्यादी कडे असलेल्या पर्समध्ये ठेवण्याचे सांगुन. त्या इसमांनी फिर्यादीस पाचशे रुपये रोख व एक केळीची फनी देवुन ते कापडी स्कार्फ मध्ये बांधुन फिर्यादीच्या ताब्यात देवुन तेथे बसण्यास सांगुन फिर्यादी कडील सोन्याची बोरमाळ,सोन्याचे गंठन,रोख रक्कम व एक मोबाईल असा एकूण ६५,५००/- रु. कि.चा ऐवज घेऊन गेले. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. लिटे मो.नं.९९२२९३३११३ |

**२**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे ७३४/२०२४,भादविक ३०४(अ) २८८,३४ |
| **फिर्यादी** | किसन माने, वय ३७ वर्षे, रा.पारगेनगर,कोंढवा खुा पुणे |
| **आरोपीत** | दोन इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२५/०४/२०२४रोजी दु.१२/३० वा.चे.सुमा.एस.पी.इन्फोसीटी,बिल्डिंग१/ए,तळमजला, फुरसुंगी, पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे नमुद ठिकाणी असलेल्या तळ मजल्यावरील एका नवीन कार्यालयातील बाथरुम मधील इंटरीयरचे काम करत असताना तेथील दोन भिंत पाडलेल्या असुन तिस-या भिंतीला कोणताही आधार नसल्याने ती भिंत कधीही पडण्याची शक्यता असताना देखील तेथील बांधकाम साईट इंजिनियर व ठेकेदार यांनी सुरक्षेबाबत कोणतेही योग्य ती उपाय योजना व खबरदारी न घेता फिर्यादी यांचा मावस भाऊ संग्राम बालाजी पांडे वय ३१ वर्षे रा.खुपट वाडी,उंड्री चौक,पुणे यांचे अंगावर भिंत पडून झालेल्या दुखापतीमुळे याचे मरणास कारणीभूत झाले. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.पवार मो.नं.८७८८२३२४१९ |

**३**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | शिवाजीनगर पो स्टे ११४/२०२४,भादविक ४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६ (ड) |
| **फिर्यादी** | एक महिला वय ३८ रा.मॉडेल कॉलनी,पुणे |

| | |
|---|---|
| **आरोपीत** | एका टेलीग्राम आयडी धारक वापरकर्ते व एक बॅक खातेधारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१९/०३/२०२४ रोजी ते दि.२४/०४/२०२४ ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांनी नमुद तारखेस व्हॉट्सअपला goldman sachs group join केला व फिर्यादी यांना एक gsiwp app downlod करुन trading करायला सांगितले.चांगले रिझल्टचे आमिष दाखवुन फिर्यादी कडुन आयएमपीएस मोड व्दारे ट्रान्जक्शन करण्यास सांगुन फिर्यादी यांची एकूण ४१,३१,२००/-रू. परत न करून फिर्यादीची आर्थिक फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पोलीस निरीक्षक (गुन्हे)श्री.अनिल माने मो.नं.९१३००१२००५. |
| **४** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो स्टे ३६९/२०२४,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | एक इसम वय ३५ वर्षे रा.बावधन खुा.पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२९/०४/२०२४ रोजी दु.१२/३०वा सुमा.हॉलीडे हॉटेलजवळ,कात्रज घाटामध्ये, कात्रज पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा वेळु ता.भोर जि.पुणे येथे कारखाना आहे.त्यांचे कारखान्या मधील एक कामगार हा त्याचे दुचाकीवरुन वेळु येथे कारखान्यावर जात असताना नमुद ठिकाणी त्या कामगाराला चक्कर येवुन पडल्यानंतर त्याचे दुचाकीवर असलेली २३,५०,०००/- रु.रोख रक्कम बॅगे सहीत कोणीतरी अज्ञात इसमाने चोरून नेली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.धिरज गुप्ता मो.नं.९८५०८२०३०७ |
| **५** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लोणीकंद पो स्टे ४३३/२०२४,भादविक ४१९,४२०,३४ सह आय.टी.ॲक्ट ६६(डी) |
| **फिर्यादी** | एक इसम वय ३८ वर्षे रा.बाईफ रोड,वाघोली पुणे |
| **आरोपीत** | एका व्हॉटसअँप ग्रुपचा अँडमिन व एक बॅकखाते धारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१२/०३/२०२४ रोजी पासून दि.१६/०४/२०२४ रोजी दरम्यान फिर्यादीचे राहते घरी |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांना व्हॉटसअँप ग्रुप Stock Vanguard या व्हॉटसअँप गुप आणि D2-IPO Peak व सदर ग्रुपचे अँडमिन व मार्गदर्शक म्हणुन काम पाहणारे मोबाईल धारक व्यक्तींनी संगणमताने स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी फिर्यादी यांना शेअर मार्केटमध्ये गुंतवणुक करण्याचे बहाण्याने त्यांचा विश्वास संपादन करून त्यांनी दिलेल्या ALICE या मोबाईल अँपमध्ये अकाउंट तयार करायला लावले. तसेच शेअर मार्केटमध्ये गुंतवणुक करण्याचे नावाखाली त्यांनी दिलेल्या वेगवेगळ्या बँक खात्यावर वेळोवेळी वेगवेगळी कारणे सांगुन रक्कम ट्रान्सफर करायला लावली. तसेच त्यांनी दिलेल्या मोबाईल अँपमध्ये जावुन त्यांनी सांगितल्याप्रमाणे शेअर ट्रेडिंग करायला लावले. तसेच सदर लिंकमध्ये केलेल्या ट्रेडिंगमध्ये नफा झाले आहे असे भासवुन फिर्यादीचा विश्वास संपादन करुन फिर्यादी यांची २१,९२,९२०/-रू.ची फसवणूक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पोलीस निरीक्षक(गुन्हे) श्रीमती सिमा ढाकणे मो.नं.८८८८८३०७१४ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**